प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. २७.०४.२०२०**

## सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांचा निकाल व भूखंडांची वाटपपत्रे ऑनलाइन उपलब्ध

कोविड-१९ अर्थात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या टाळेबंदीच्या पार्श्वभूमीवर सिडकोच्या विविध गृहनिर्माण योजनांतील यशस्वी अर्जदारांची यादी व भूखंडांच्या ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रिये अंतर्गत यशस्वी ठरलेल्या बोलीधारकांना वाटपपत्रे ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

सिडकोच्या स्वप्नपूर्ती गृहनिर्माण योजने अंतर्गत शिल्लक असलेल्या नवी मुंबईतील खारघर येथील ८१० घरांसाठी दि. ११ सप्टेंबर २०१९ रोजी योजना जाहीर करण्यात आली होती. सदर योजनेची सोडत २६ नोव्हेंबर २०१९ रोजी काढण्यात आली. त्यानंतर यशस्वी अर्जदारांची कागदपत्र पडताळणी करून पात्र ठरलेल्या अर्जदारांची अंतिम यादी/निकाल दि. २६ एप्रिल २०२० रोजी www.cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. याचबरोबर पुढील प्रक्रियेबाबत अर्जदारांना लवकरच कळविण्यात येईल.

तसेच गृहनिर्माण योजना ऑगस्ट-२०१८ अंतर्गत नवी मुंबईच्या विविध नोडमधील १४,८३८ परवडणाऱ्या घरांची योजना १३ ऑगस्ट २०१८ रोजी जाहीर करण्यात आली होती. सदर योजनेची सोडत २ ऑक्टोबर २०१८ रोजी काढण्यात आली व यशस्वी अर्जदारांच्या कागदपत्रांची पडताळणी करून पात्र अर्जदारांना वाटपपत्र देण्यात आले. तथापि, काही अर्जदारांनी घरे सरेंडर/रद्द केली तर काही अर्जदार कागदपत्रे छाननी अंतर्गत अयशस्वी ठरल्याने प्रतीक्षा यादीतील अर्जदारांना संधी देण्यात आली. प्रतीक्षा यादीतील अर्जदारांची कागदपत्र पडताळणी करून पात्र अर्जदारांची अंतिम यादी/निकाल २६ एप्रिल २०२० रोजी जाहीर करण्यात आली असून सदर यादी अर्जदारांना www.cidco.nivarakendra.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. पुढील वाटपपत्राची कार्यवाही देखील लवकरच पूर्ण करण्यात येईल.

ज्या सदनिकाधारकांना ५ वा हफ्ता भरतेवेळी टाळेबंदीमुळे अडचण आली आहे अथवा ते हफ्ता भरू शकले नाहीत, अशा सदनिकाधारकांना यापूर्वीच ३० जून २०२० पर्यंत सदनिकेचा हफ्ता भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे. त्याचप्रमाणे ज्या सदनिकाधाराकांना येस बँकेच्या समस्येमुळे हफ्ता भरतेवेळी अडचण आली आहे वा ते हफ्ता वेळेत भरू शकले नाही, अशा सदनिकाधारकांच्या विलंब शुल्काबाबतही निर्णय घेण्यात येणार आहे.

सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर, नवीन पनवेल (प.), सीबीडी बेलापूर येथील ९ भूखंड (निवासी + वाणिज्यिक वापर) आणि वाशी येथील २ भूखंड (वाणिज्यिक वापर) ई-निविदा आणि ई-लिलाव प्रक्रियेद्वारे दि. १८ जानेवारी २०२० रोजी विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. त्यांपैकी नवीन पनवेल (प.) व खारघर येथील ८ महत्तम बोलीधारकांना भूखंडांचे वापटपत्र कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर बोलीधारकांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवर पाठविण्यात आले आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा.संपादक महोदय,

वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धी देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**